**मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**सायबर गुन्हे कक्ष**

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट :-११२/२०२२ दिनांक – २५/०४/२०२२

# India Post च्या नावाने फसव्या योजनांचे फसवणुकीबाबत घ्यावयाची काळजी....

देशात जसजस डिजिटायझेशन वाढतयं, तशातशा देशातल्या सामान्य माणसाला मिळणाऱ्या सुविधाही वाढत आहेत. डिजीटल इंडीया मुळे एकीकडे लोकांच्या अनेक समस्या संपल्यात, तर दुसरीकडे ठगांना फसवणूक करण्यासाठी नवे व्यासपीठ मिळाले आहे. इंटरनेटवर सक्रीय असलेले सायबर ठग संधी मिळताच निष्पाप लोकांना आपला बळी बनवतात आणि काही मिनटात त्यांच्या कष्टाची कमाई घेवून जातात. अशाच प्रकारच्या फसवणुकीच्या क्लृप्त्या निदर्शनास येत आहेत.

**"टपाल विभागाच्या सर्वेक्षणात सहभागी व्हा आणि बक्षिस किंवा अनुदान मिळवा."**

**India Post** चे नाव घेताच सामान्य माणसांच्या मनात विश्वासार्हता निमार्ण होते. **India Post** च्या वेगवेगळया बचतीच्या योजना अस्तित्वात आहेत. अशा योजनाबाबतची एखादी लिंक तुम्हाला समाजमाध्यमांवर दिसली असेल किंवा ईमेल आणि लघूसंदेशावर प्राप्त झाली असल्यास त्यावर विश्वास ठेवू नका, असे आवाहन टपाल विभागाकडून करण्यात आले आहे.

गेल्या काही दिवसांपासून टपाल विभागाच्या अनुदान योजनांचा विविध संकेतस्थळांनी समाजमाध्यमांवर धुमाकूळ घातला आहे. व्हॉट्सअॅप, टेलीग्राम, इन्स्टाग्रामवर विविध युआरएल आणि संकेतस्थळे भारतीय डाकचा लोगो वापरुन प्रसारीत केले जात आहेत. यात एका सर्वेक्षणाद्वारे आर्थिक लाभ मिळविण्याचे आमिष दाखविले जात आहे. मात्र अशी कोणतीही योजना भारतीय टपाल विभागाने राबवली नसल्याचे स्पष्ट केले आहे.

**फसवणुकीचा प्रकार :-** सर्वेक्षण लिंकवर क्लिक केल्यानंतर मोठया प्रमाणात आर्थिक अनुदान, बोनस, बक्षिस असे आमिष दाखविले जाते.त्यामध्ये आपले बँक खाते तपशील, जन्मदिनांक व इतर वैयक्तीक माहीती भरण्याकरीता फॉर्म असतो. तो भरल्यानंतर ओटीपी प्राप्त होतो. सदर ओटीपी टाकल्यास आपली आर्थिक फसवणूक होते.

**घ्यावयाची काळजी...**

- अशा प्रकारे अनोळखी लिंक प्राप्त झाल्यास त्यावर क्लिक करु नये.
- तसेच आपले बँक खाते तपशील, जन्मदिनांक वा इतर वैयक्तीक माहीती उघड करुन नये.
- आपले मोबाईलवर प्राप्त होणारा ओटीपी कुणालाही देवू नये.
- आर्थिक गुंतवणूक करावयाची असल्यास प्रत्यक्ष टपाल विभागात भेट देवून खातरजमा करुन घ्यावी.
- कोणत्याही अनोळखी लिंक वर क्लिक करण्यापुर्वी त्याची विश्वासर्हता पडताळणी करुन घ्यावी.

तरी मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच **www.cybercrime.gov.in** अथवा **1930** या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

-----oooo----